# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कु.क सोसायटी धुळे

आरोग्य विभाग जिल्हा परिषद धुळे

D-706

आरोग्य सेवा

जाक्र/जिआसोधु/MMU दरपत्रक/ /२६
जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय,धुळे
दिनांक -25/08/२०२६

**टेंम्पो टॅव्हलर रुग्णवाहीका व त्यापेक्षा मोठया प्रकारचे वाहन भाडेतत्वावर घेणेसाठी**

**दरपत्रक**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत धुळे जिल्हा मोबाईल मेडीकल युनिट करीता टेम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहिका व टेम्पो ट्रॅव्हलर त्यापेक्षा मोठ्या प्रकारचे वाहन भाडेपद्धतीने घेणेसाठी वाहन मक्तेदारांकडून सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत. दरपत्रकाच्या खालीलप्रमाणे अटी व शर्ती असतील.

१) दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहोचणे आवश्यक आहे.

२) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

३) सिलबंद लखोटयावर राष्ट्रीय आरोग्य अभियान, मोबाईल मेडीकल युनिट करीता टेम्पो ट्रॅव्हलररुग्णवाहिका टेम्पो ट्रॅव्हलर त्यापेक्षा मोठ्या प्रकारचे वाहन भाडेतत्तावर पुरविणेसाठी दरपत्रक असा उल्लेख करावा.

४) वाहन खरेदी ७ वर्षा आतील असावी.

५) वाहनाची मर्यादित धाव २००० किमी प्रति महा या मर्यादित निश्चित करणेत आलेली आहे. शासकीय वापराकरिता वाहनाची दरमहा धाव १००० किमीचे अधिन राहून देय्यक अदा करणेत येईल. वाहनाची धाव ३००० किमी पेक्षा कमी झाल्यास ३००० किमीचे देय्यक अदा करणेत येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहनाची धाव २००० किमी पेक्षा जास्त झाली असेल, तेव्हा झालेले अतिरिक्त देय्यक दरपत्रकानुसार निश्चित करणेत आलेल्या प्रतिकिमी दराने अदा करण्यात येईल.

६) भाडेतत्तावरील वाहन जोपर्यंत नविन करार केला जात नाही तो पर्यंत या कालावधी पर्यंत ग्राहय राहिल.

७) १०० रु. चे बॉन्डवर विहित सर्व अटी व शर्थी करारपत्रकावर लिहून देणे बंधनकारक असेल.

८) वाहन सेवा ही २४ X ७ कालावधीसाठी वाहन चालकासह कार्यालयासाठी उपलब्ध असावी. त्यासाठी चालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

९) दरपत्रकासोबत आरसी बुक, वाहनाचा विमा, प्रवासी वाहतुक परवाना, पॅनकार्ड, वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स ही व आवश्यकतेप्रमाणे इतर प्रमाणपत्रे स्व-साक्षांकित करून सोबत जोडणे बंधनकारक आहे.

१०) दरपत्रक सादर करताना GST क्रमांक देणे आवश्यक आहे. तथापि GST क्रमांक लागू नसल्यास तसा लेटर हेडवर दाखला देणेत यावा.

११) पुरविल्या जाणाऱ्या वाहनाची सर्व कागदपत्रे अद्ययावत विमा, नोंदणी पुस्तक, रोड टॅक्स, पेमेंट आवश्यकतेनुरुप राज्यातील कायद्यानुसार सोसायटीला पुरवावी लागतील. या अदी आणीबाणीच्या काळात किंवा बदलीच्या पाळात पुरविल्या जाणाऱ्या वाहनासाठी असतील.

Scanned with OKEN Scanner

१२) दरपत्रक धारकाने सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून आणि समजावून घेवून दरपत्रक सादर करावे शंका असल्यास त्याबद्दल स्पष्टीकरण घ्यावे. परंतु त्यासाठी दरपत्रक सादर करण्यासाठी दिरंगाई करता येणार नाही.

१३) दरपत्रक धारकाने आपल्या वाहन भाडयाचे दर अंकात आणि अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात स्पष्ट करावेत. दोन्ही मध्ये फरक आढळल्यास अक्षरी दर वैध ठरविला जाईल

१४) दरदत्रक सादर करताना मुद्रणात झालेली खाडाखोड साक्षांकित पूर्ण स्वाक्षरीसह दरपत्रक धारकाने सादर करावी.

१५) वाहनाच्या चालकाला कार्यालयाच्या परिक्षेत्रात येण्यासाठी सुरक्षेच्या वर्तमान कायद्यानुसार ओळखपत्र काढण्याची जबाबदारी वाहन मक्तेदाराची राहील. ओळखपत्राशिवाय चालकाला कार्यालय परिक्षेत्रात प्रवेश करता येणार नाही. तसेच वाहन चालविण्याचा चालकाची परवान्याची साक्षांकित प्रत कार्यालयास सादर करावी.

१६) वाहन मक्तेदाराने धुळे जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीने मागणी केल्यास आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, अस्तित्वात असलेल्या शासकीय नियम आणि कायद्यानुसार आयकर कपात केला जाईल.

१७) कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनांच्या भागांची टायर, ल्युब्रीकंटस, डिजेल आविच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत /तशी मागणी करता येणार नाही. याबाबत अंतिम निर्णय अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, धुळे (कार्यकारी समिती) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांचे राहतील,

१८) देयक सादर करताना लॉगबुक पडताळणी करीता सादर करावे वाहन वापरलेल्या अधिकाऱ्याची सही लॉगबुकवर घेणे बंधनकारक आहे. लॉगबुक सादर न केल्यास देयके पारीत करता येणार नाहीत, परिपुर्ण लॉगबुक सादर करणेची जबाबदारी वाहनधारकाची राहिल.

१९) कोणतेही कारण न देता वाहनासाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, धुळे (कार्यकारी समिती) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनी राखून ठेवलेला आहे.

२०) दरपत्रकातील दर हे सर्व करासहित असावे.

| अ.क्र | वाहनाचा सविस्तर तपशिल | रक्कम प्रति किमी |
|---|---|---|
| १ | टेंम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहिका व त्यापेक्षा मोठया प्रकारचे वाहन | |

दरपत्रके सिलबंद पाकीटात दिनांक / /२०२६ रोजी सायं. ५.३० वाजेपर्यंत जिल्हा आरोग्य अधिकारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, धुळे या मुख्य कार्यालयीन टपालात आणून देणेची आहेत. सदर दरपत्रके शक्यतः त्याच दिवशी सायं. ६.०० वाजता सहभागी मक्तेदारांचे उपस्थितीत उघडण्यात येतील. संबंधित वाहन मक्तेदारांनी कार्यालयाकडून माहिती घेऊन उपस्थित राहाणेचे आहे. अनुपस्थित राहणा-या मक्तेदारांचे हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची मक्तेदारांनी नोंद घ्यावी.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद धुळे

Scanned with OKEN Scanner